# महाराष्ट्र शासन
## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई
**८ वा मजला, न्यू एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

ई-मेल : maharashtra.cetcell@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२-२२०१६१५९. वेबसाईट :www.mahacet.org


क्र.उशिप्र-११२०/प्र.क्र.२३/कें.प्र.प्र/प्रमाणपत्र सादरीकरण/१३७६. दिनांक:- २८/१२/२०२०.

**परिपत्रक क्रमांक – १**

**विषय : पदवी प्रवेश प्रक्रिया २०२०-२१ अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (EWS) प्रमाणपत्र / जात पडताळणी प्रमाणपत्र (Caste Validity Certificate – CVC) संदर्भात आणि उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (Non Creamy Layer –NCL) प्रमाणपत्र दाखल करणेबाबत...**

**संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई क्र. बैठक – २०२०/प्र.क्र.१३९/तांशि-४, दिनांक : २६ नोव्हेंबर २०२०.**

**२. सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र. क्र. ३१/१६-अ दिनांक २३ डिसेंबर २०२०.**

उपरोक्त विषयानुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील विधी ५ वर्ष (एकात्मिक), विधी ३ वर्ष, बी.एड , एम.एड , बी.पी.एड , एम.पी.एड, बी.ए.बी.एड/ बी.एस्सी.बी.एड (एकात्मिक) आणि बी.एड-एम.एड (एकात्मिक) अश्या एकूण ८ व्यावसायिक अभ्यासक्रमांची सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राज्य सामाईक प्रवेश कक्षामार्फत राबविण्यात येते.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ०९/०९/२०२० रोजीच्या अंतरिम स्थगिती आदेश विचारात घेता आणि सामान्य प्रशासन विभागाचा क्र. राआधो ४०१९/प्र.क्र ३१/१६ –अ दि. २३ डिसेंबर, २०२० शासन निर्णय विचारात घेऊन सदर प्रवेश प्रक्रीये अंतर्गत सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील (SEBC) उमेदवारांना सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेण्यासाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (EWS) प्रमाणपत्र देण्यास मान्यता मिळाली आहे.

तसेच संदर्भ क्र. २ मधील शासन पत्र विचारात घेता खालील कार्यपद्धती निश्चित करण्यात येत आहे.

१. सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील (SEBC) आणि खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकडे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (EWS) प्रमाणपत्र नसल्यास ज्या उमेदवारांनी सदर प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज सादर केलेला आहे अशा उमेदवारांनी त्याबाबतची पावती upload करावी. या उमदेवारांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) या आरक्षित प्रवर्गात ग्राह्य धरून पहिली ऑनलाईन प्रवेश फेरी राबविण्यात येईल. परंतु या उमेदवारांनी सदर ऑनलाईन प्रवेश फेरीच्या रिपोर्टिंग वेळी संबंधित महाविद्यालयाकडे मूळ प्रमाणपत्र सादर करावे. अन्यथा संबंधित महाविद्यालय प्रवेशाचे वाटप रद्द करेल आणि सदर उमेदवारास पुढील प्रवेश प्रक्रीयेअंतर्गत खुल्या प्रवर्गातील ग्राह्य धरण्यात येईल.

२. सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील (SEBC) आणि खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकडे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (EWS) प्रमाणपत्र मिळण्यासाठीची पावती Upload केलेली आहे आणि पहिल्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप झालेले नाही अशा उमेदवारांनी पहिल्या ऑनलाईन प्रवेश फेरीच्या रिपोर्टिंगच्या अंतिम दिनांकापर्यंत (EWS) प्रमाणपत्र मिळाल्यास त्यांना त्याच्या लॉगिनद्वारे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (EWS) प्रमाणपत्र Upload करता येईल आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (EWS) प्रवर्गात ग्राह्य धरण्यात येईल. अन्यथा पुढील प्रवेश फेऱ्याकरिता उमेदवारांना खुल्या प्रवर्गासाठी ग्राह्य धरले जाईल.

अशी कार्य पद्धती जात पडताळणी प्रमाणपत्र (Caste validity Certificate – CVC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल (EWS) आणि उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याने (Non Creamy Layer – NCL) प्रमाणपत्राबाबत अनुसरण्यात येईल.

सध्याच्या वेळापत्रकानुसार अभ्यासक्रमनिहाय प्रथम फेरीची प्रवेशाची अंतिम दिनांक पुढीलप्रमाणे –

| अ.क्र | अभ्यासक्रम | प्रथम फेरीची प्रवेशाची अंतिम तारीख * |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | बी.ए.बी.एड/ बी.एस्सी.बी.एड (एकात्मिक) | दि. ०७/०१/२०२१ |
| २ | बी.एड-एम.एड (एकात्मिक) | दि. ०७/०१/२०२१ |
| ३ | एम.पी.एड | दि. ०९/०१/२०२१ |
| ४ | एम.एड | दि. १२/०१/२०२१ |
| ५ | बी.पी.एड | दि. १२/०१/२०२१ |
| ६ | बी.एड आणि ELCT | दि. १८/०१/२०२१ |
| ७ | विधी ३ वर्ष | दि. २७/०१/२०२१ |
| ८ | विधी ५ वर्ष (एकात्मिक) | दि. २८/०१/२०२१ |

* सध्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या अभ्यासक्रमनिहाय वेळापत्रकात बदल झाल्यास सुधारित वेळापत्रकात प्रथम फेरीचा अंतिम दिनांक नमूद केलेला असेल.

उपरोक्त नमूद अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रीये दरम्यान जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate – CVC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आणि नॉन क्रिमीलेअर (Non Creamy Layer – NCL) प्रमाणपत्र मिळविण्यासाठीचा अर्ज सादरीकरणाची पोच पावती सादर केलेल्या उमेदवारांसाठी जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate – CVC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आणि नॉन क्रिमीलेअर (Non Creamy Layer – NCL) प्रमाणपत्र प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याचा अंतिम दिनांक वरील तालिकेत स्तंभ क्र.३ मध्ये नमूद केलेले आहे या दिनांकनंतर जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate – CVC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आणि नॉन क्रिमीलेअर (Non Creamy Layer – NCL) मूळ (Original) स्वरुपात अपलोड न करणाऱ्या उमेदवारांना खुल्या संवर्गातून पात्र होण्यासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीसाठी आपल्या ऑनलाईन प्रवेश अर्जात योग्य ते बदल करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

जर अशा अर्ज सादरीकरणाची पोच पावती सादर केलेल्या उमेदवाराचे प्रवेश महाविद्यालयांनी प्रथम फेरीत निश्चित केलेले असल्यास ते प्रवेश महाविद्यालयाच्या लॉग इन मधून महाविद्यालयांनी रद्द करणे बंधनकारक असेल. जर सदर प्रवेश रद्द केले नाही तर संपूर्ण जबाबदारी प्रवेश देणाऱ्या महाविद्यालयाची असेल.

वरील बाबीची सर्व संबंधित अभ्यासक्रमासाठी ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी आणि प्रवेश प्रक्रियेत सहभागी झालेल्या महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

(चिंतामणी जोशी) भा.प्र.से
आयुक्त
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रति :

१) सर्व संबधित उमेदवार.
२) सर्व कृषी व अकृषी विद्यापीठाचे अधिष्ठाता.
३) सर्व विधी , शिक्षणशास्त्र शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे / विभागाचे प्राचार्य व प्रमुख.

प्रत :

१) महाआयटी, मुंबई आणि तलिस्मा कॉ. प्रा.लि बंगळूर यांना सूचित करण्यात येते कि. सदरचे परिपत्रक त्यांनी त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे व परिपत्रकामधील कार्यपद्धतीनुसार संगणक प्रणालीमध्ये / विद्यार्थी आणि महाविद्यालयांच्या लॉग इन मध्ये आवश्यक त्या सुविधा त्वरित उपलब्ध कराव्यात
२) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१ यांना माहितीकरिता.